# पीओपीच्या गणेशमूर्ती आम्ही कदापि घेणार नाही

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

बदलत्या हवामानात नैसर्गिक पाणी स्त्रोत जपणे हे अत्यंत मोलाचे कार्य आहे. सरकार सातत्याने पाण्यातील प्रदूषणमुक्तीच्या योजना जाहीर करीत आहे. प्लास्टिक आणि थर्माकोलवरही सरकारने बंदी आणली. ओढे, नदी, विहिरी, समुद्र या सर्व जलस्त्रोतांतील प्रदूषण कमी करायचे असेल तर आणखी एक निर्णयही घ्यावा लागेल! यंदाच्या वर्षी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तींवर सरकारने बंदी आणावी! हा निर्णय आत्ताच घ्यावा, ही दैनिक 'नवाकाळ'ची आग्रही मागणी आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) हे पाण्यात विरघळत नाही. पीओपी पाण्यात विरघळवायचे असेल तर पाण्यात बेकिंग सोडा टाकून रासायनिक मिश्रण तयार करावे लागते. या मिश्रणातच पीओपीची मूर्ती विरघळते. हे मिश्रण तयार केले नाहीतर मूर्तींचे विसर्जन करूनही त्या जशाच्या तशा राहतात. त्यामुळे पीओपी घातक नाही, असे कुणी कितीही ओरडत असले तरीसुद्धा पीओपी घातकच आहे. गावच्या विहिरी तर विसर्जनामुळे गणेशमूर्तींनी इतक्या भरल्या आहेत की, विहिरीचे पाणी पिता येत नाही. तीच स्थिती नदी आणि समुद्राची होईल. जिथे विसर्जनासाठी कृत्रिम तलाव केले जातात, त्या तलावांतही पीओपीच्या मूर्ती तशाच राहतात. या मूर्ती रात्रीच्या अंधारात गोळा करून डम्पिग ग्राऊंडवर किंवा समुद्रात फेकल्या जातात. हे सर्व आपल्या दृष्टिआड घडते म्हणून काहीच घडत नसल्यासारखे आपण गप्प बसायचे का?

गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी कोल्हापूर आणि पुणे पालिकेने कृत्रिम तलाव तयार केले होते. मात्र या तलावांत विसर्जन केलेल्या मूर्ती तशाच राहतात, हे लक्षात आल्यावर गेल्या वर्षी या दोन्ही कृत्रिम तलावांतील पाण्यात बेकिंग सोडा टाकून मूर्ती विरघळवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु इतकं सर्व केल्यावरही हे रासायनिक पाणी कोणत्यातरी जिवंत जलस्त्रोतातच ओतावे लागते. असे असताना पीओपीच्या गणेशमूर्ती साकारणे हा बुद्धीचा देव गणेशाचा अवमान करण्यासारखे आणि निसर्गाशी खेळ करण्यासारखे आहे. त्यामुळे गणेशभक्तांनी हे पाप करू नये, असे आम्ही आवाहन करीत आहोत.

गणेश मंडळांनीही पीओपीच्या मूर्ती साकारू नयेत. उंच मूर्ती हवी म्हणून पीओपी वापरायचे ही श्रद्धा नाही, व्यवहार आहे. गणेशोत्सवात श्रद्धा महत्त्वाची की उंच मूर्तींचा देखावा साकारून कमाई करणे महत्त्वाचे, हे गणेश मंडळांनी ठरविले पाहिजे. खरे तर पीओपी नको ही मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने जानेवारीपासूनच लावून धरायला हवी होती. दरवर्षी बाजारात मूर्ती दिसायला लागल्यावर जागे व्हायचे हा खेळ किती वर्षे खेळला जाणार आहे? पीओपी बंद करण्याची मागणी केली की, गणेश मंडळे त्रागा करणार या भीतीने समन्वय समिती बोटचेपी भूमिका घेत असेल तर ते दुर्दैव आहे.

पीओपीच्या मूर्ती स्वस्त असतात. मातीच्या मूर्ती महाग पडतात असा युक्तिवाद केला जातो. हा युक्तिवाद करायचा तर आपण पिझ्झा खातो, सिनेमा बघतो, अगदी मोबाईलही वारंवार रिचार्ज करतो. मग एक महिना बचत करून थोडी महाग मातीची मूर्ती आणायला काय हरकत आहे? आपण स्वस्त पडेल म्हणून पीओपीची मूर्ती आणायची, तिची मनोभावे पूजा करायची आणि मग विसर्जन केल्यावर ती विरघळत नसल्याने त्या मूर्तीची इकडून तिकडे फेकाफेकी होऊ द्यायची हे मनाला पटते का?

दोन वर्षांपूर्वी पीओपीवर बंदी आणण्याचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा पीओपीवर बंदी आणलीत तर माती पुरवा, अशी मागणी मूर्तिकारांनी सरकारकडे केली. माती पुरेशी उपलब्ध नाही, असा कांगावा केला. मूर्तिकारांचा अपमान करण्याची आमची इच्छा नाही. पण त्यांच्या या दबावाला बळी पडता कामा नये. प्लास्टिकवर बंदी आणली असता महिनाभरात बांबूचे चमचे मिळू लागले. हे कसे शक्य झाले? कारण व्यापारी हा व्यापारी असतो, तो कमाईचे मार्ग शोधतोच. पीओपी मूर्तींवर बंदी आणली की माती उपलब्ध करण्याचा मार्ग मूर्तिकार शोधतील. फक्त त्यांना तितका अवधी द्यायला हवा. सरकारने माती पुरविण्याची कोणतीही गरज नाही.

पीओपीच्या गणेशमूर्तींवर बंदी आणण्याचा निर्णय सरकारने घ्यायला हवा. जर सरकारने हा निर्णय घेतला नाहीतर काय करायचे? आपण हातावर हात ठेवून थांबायचे का? अजिबात नाही. आपण स्वत: पुढाकार घ्यायचा. प्रत्येकाने स्वत:च्या घरी मातीची मूर्ती आणायचे ठरवून मातीच्या मूर्तीचे बुकिंग केले तरी फार मोठा फरक पडेल. मी एकट्याने करून काय होणार आहे, ही रडकी वाक्ये उच्चारण्यापेक्षा मी सुरुवात करणार या वाक्यानेच बदल घडेल, हा विश्वास ठेवा. # Saynotopopmurti या 'नवाकाळ'च्या प्रेरणेत सामील व्हा, आपले पाण्याचे स्त्रोत वाचवा आणि खऱ्या गणेशभक्तीचे प्रतिक बनून आपण शक्य तितक्या कुटुंबांपर्यंत हा संदेश पोचवूया.